

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

मे २०२६

# विद्यावार्ता

ई - मासिक

## विद्यापीठ संचालित
## बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजच्या
## नूतन इमारतीचे भूमिपूजन






# विद्यावार्ता
ई - मासिक

# अनुक्रमणिका


- विद्यापीठ संचालित बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन १
- विद्यापीठाचा ४३ वा वर्धापन दिन व महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा ४
- विद्यापीठात उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार व वार्षिकांक स्पर्धेतील विजेत्यांचा कुलगुरूंचे हस्ते सत्कार ७
- विद्यापीठात 'नो व्हिकल डे' ला पर्यावरणस्नेही प्रतिसाद १५
- विद्यापीठ संचालित मॉडेल डिग्री कॉलेजच्या विद्यार्थीनीची उंच भरारी १६
- पं. दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद १७
- पाचही जिल्ह्यात उष्माघात मदत कक्ष स्थापन १८
- आयुष्यमान भारत कार्ड विशेष शिबीराला कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद २०
- विद्यापीठात 'नो व्हिकल डे' व ऑनलाईन बैठकांवर भर २१
- विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा कुलगुरूंचे हस्ते सत्कार २२
- विद्यापीठात सेवानिवृत्ती कार्यक्रम संपन्न २३
- जयंती विशेष २८
- बातमी कात्रणे ३०





संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

मार्गदर्शक

**डॉ. मिलींद बारहाते**

मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**डॉ. महेंद्र ढोरे**

मा. प्र- कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रकाशक

**डॉ. अविनाश असनारे**

कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

संपादक

**डॉ. विलास नांदुरकर**

जनसंपर्क अधिकारी

https://www.sgbau.ac.in




# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील - केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव

## विद्यापीठ संचालित बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन



भूमिपूजन करतांना ना. प्रतापराव जाधव

बुलढाणा हा जिल्हा शैक्षणिकदृष्ट्या मागे असला तरी, आता जिल्ह्यात मॉडेल डिग्री कॉलेज, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि कृषी महाविद्यालयासारख्या संस्था उभ्या राहत आहेत. या शैक्षणिक व पायाभूत सुविधांमुळे जिल्ह्याचा कायापालट होणार असून, सर्वांगीण विकासासाठी आम्ही सर्व लोकप्रतिनिधी कटिबध्द आहोत, असे प्रतिपादन केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संचालित बिरसिंगपूर येथील मॉडेल डिग्री कॉलेजच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते पार पडले, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार संजय गायकवाड, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. व्ही. एच. नागरे, मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ. ए.आर. म्हळसने, कार्यकारी अभियंता जे.एन. काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील तसेच बिरसिंगपूरच्या सरपंच श्रीमती वैशाली शिंदे, प्राचार्य डॉ. निलेश गावंडे, श्री राजेंद्र पांडे, श्री राजपूत आदी उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव म्हणाले की, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून आज महाविद्यालयाच्या इमारतीच्या कामाला सुरुवात होत आहे. या महाविद्यालयामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी उत्तम सोय उपलब्ध होणार आहे. सुसज्ज शैक्षणिक व प्रशासकीय इमारतीसोबतच येथे स्विमिंग पूल, क्रीडांगण यांसारख्या आधुनिक सुविधा निर्माण केल्या जातील. यातून गुणवंत विद्यार्थी घडतील आणि जिल्ह्याचा नावलौकिक वाढेल. मॉडेल डिग्री कॉलेज हे सर्व कॉलेज करता आदर्श राहील. तसेच, सध्याच्या जागतिक युध्दजन्य परिस्थितीचा विचार करता, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या काटकसरीच्या आवाहनाचे सर्वांनी पालन करावे, असेही त्यांनी नमूद केले.

आमदार संजय गायकवाड यांनी आपल्या भाषणात सांगितले की, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बाहेरगावी जावे लागत होते. परंतु आता मॉडेल डिग्री कॉलेजमुळे जिल्ह्यातच गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम उच्च दर्जाचे व्हावे, अशा सूचनाही त्यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या.




संबोधित करतांना ना. प्रतापराव जाधव

भूमिपूजन सोहळ्याचे अध्यक्षीय भाषण विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. यावेळी कंत्राटदार श्री प्रतीक राजपूत व आर्किटेक्चर श्री संजय देशमुख यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे यांनी मान्यवर अतिथींना मॉडेल डिग्री कॉलेजच्या इमारतीच्या मॉडेलची सविस्तर माहिती दिली.

सुरुवातीला छत्रपती संभाजी महाराज व कर्मयोगी श्री संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी, तर सूत्रसंचालन व आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले. कार्यक्रमाला विद्यापीठ अभियंता श्री शशिकांत रोडे, उपकुलसचिव विधी श्री मंगेश जायले, प्राचार्य डॉ. गजानन जाधव, प्राचार्य डॉ. नितीन सांगोले, प्राचार्य डॉ. गायकी, विद्यापीठ प्राधिकारणीचे सदस्य, बुलढाणा शहरातील गणमान्य नागरिक, बिरसिंगपूर येथील रहिवासी तसेच विद्यापीठातील अभियांत्रिकी विभागातील कर्मचारी, मॉडेल डिग्री महाविद्यालयाचे प्राध्यापक तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




मार्गदर्शन करतांना आ. संजय गायकवाड



फलकाचे विमोचन करतांना केंद्रीय मंत्री ना. प्रतापराव जाधव, कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, आ. संजय गायकवाड व आदी.



कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर








# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा ४३ वा वर्धापन दिन व महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

# कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे हस्ते ध्वजारोहण

## 'ब्रँड एस.जी.बी.ए.यु.' घडविण्याचा संकल्प - कुलगुरू



ध्वजारोहणानंतर मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा ४३ वा वर्धापन दिन, महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून विद्यापीठामध्ये १ मे रोजी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या मंगल प्रसंगी विद्यापीठाच्या गौरवशाली प्रवासाचा आढावा घेत, येणाऱ्या काळात 'ब्रँड एस.जी.बी.ए.यु.' जागतिक स्तरावर नेण्याचा संकल्प कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी व्यक्त केला. ध्वजस्तंभाजवळ प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर व श्री राजेश पिदडी उपस्थित होते.

मार्गदर्शन करतांना कुलगुरू पुढे म्हणाले, विद्यापीठाने २५ कोटी रुपयांचा 'सेंटर ऑफ एक्सलन्स इन ए.आय. मशीन लर्निंग' चा प्रस्ताव सादर केला असून, सर्व विद्याशाखांमध्ये 'इंट्रोडक्शन टू ए.आय.' विषय अनिवार्य करणारे हे अग्रगण्य विद्यापीठ ठरले आहे. कॅम्पसमध्ये १० जी.बी.पी.एस. इंटरनेट कनेक्टिव्हिटीसह 'नेक्स्ट जनरेशन' केंद्र उभारले जात आहे. नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत डेटा सायन्स, रिटेल मॅनेजमेंट यांसारखे नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम आणि 'इंटर्नशिप पोर्टल' सुरु करण्यात आले आहे. विद्यापीठाने केवळ नोकरी मागणारे नव्हे, तर नोकरी देणारे तरुण घडविण्यावर भर दिला आहे. 'स्टार्टअप इंडिया' अंतर्गत ७ स्टार्टअप्सना ५२ लाखांचा निधी वाटप करण्यात आला.

३९ व्या आंतर विद्यापीठ युवा महोत्सवात यश मिळिवण्यासोबतच, सॉफ्टबॉलमध्ये महिला व पुरुष दोन्ही संघांनी राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला. क्रीडा व सांस्कृतिक स्तरावर विद्यापीठाचे खेळाडू व कलाकारांनी उत्कृष्ट प्रदर्शन करुन विद्यापीठाच्या नावलौकिकात भर टाकली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी प्रशंसनीय कामगिरी केली. आर्चरीमध्ये यशदीप भोगे याने आशियाई सुवर्णपदक जिंकून विद्यापीठाचा नावलौकिक वाढवला. 'पीएम–उषा' योजनेतून ४० कोटींच्या निधीद्वारे नूतनीकरण आणि चिखलदरा येथे 'ट्रायबल स्कील डेव्हलपमेंट सेंटर' ची उभारणी केली जात आहे. 'कौशल्य हेच भविष्यातील चलन आहे', असे नमूद करत विद्यापीठ सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल करताना विकसित भारतासाठी 'संशोधन आणि समाज' यांची सांगड घालण्याचे आवाहन कुलगुरूंनी याप्रसंगी केले.

ध्वजारोहण कार्यक्रमाकरीता प्रांगणात विद्यापीठातील सर्व प्रशासकीय व शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन क्रीडा व शारीरिक मंडळाच्या प्रभारी संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले.



ध्वजारोहण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



कार्यक्रमाला उपस्थित कर्मचारी व विद्यार्थी




ध्वजारोहणानंतर मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



कार्यक्रमाला उपस्थित कर्मचारी व विद्यार्थी



# विद्यापीठात उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारप्राप्त व वार्षिकांक स्पर्धेतील विजेत्यांचा कुलगुरूंचे हस्ते सत्कार .. विद्यापीठ स्थापनेला त्रेचाळीस वर्षे पूर्ण



उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारप्राप्त कर्मचाऱ्यांसमवेत कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व इतर

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा त्रेचाळीसावा वर्धापन दिन, महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार २०२६ व वार्षिकांक स्पर्धा २०२४-२५ चे पुरस्कार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. हेमंत देशमुख, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ.सौ. वैशाली गुडधे, मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ.सौ. मोना चिमोटे व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

## उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार

उत्कृष्टसेवा गौरव पुरस्कारांतर्गत शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व १०० ग्रॅम चांदीचे पदक देवून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक स्तरावरील संवर्गात उत्कृष्ट शैक्षणिक कार्याबद्दल इंदिरा महाविद्यालय, कळंबचे प्राचार्य डॉ. पवन भाऊ मांडवकर यांचा, संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक संवर्गात गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदुरबाजार येथील प्राध्यापक तथा रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. नंदकिशोर दिनकरराव गव्हाळे व श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील प्राध्यापक तथा प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जयश्री दिपक धोटे यांचा, विद्यापीठ स्तरावरील शिक्षक संवर्गात विद्यापीठाच्या गृहविज्ञान विभागातील प्राध्यापक डॉ. संयोगिता विलास देशमुख यांचा, विद्यापीठ प्रथम श्रेणी अधिकारी संवर्गात परीक्षा विभागातील सहा. कुलसचिव श्री मिलींद दत्तात्रय देशपांडे व महाविद्यालयीन विभागातील सहा. कुलसचिव डॉ. साक्षी संजयसिंह ठाकूर यांचा, विद्यापीठ द्वितीय श्रेणी अधिकारी संवर्गात आस्थापना विभागातील अधीक्षक श्री अमोल अशोकराव म्हैसाळकर व परीक्षा विभागातील अधीक्षक सौ. स्मिता अमोल म्हैसाळकर यांचा, विद्यापीठ तृतीय श्रेणी कर्मचारी संवर्गात वित्त विभागातील वरीष्ठ सहाय्यक श्री संजय गुलाबराव कोकाटे व ज्ञानस्त्रोत केंद्रातील ग्रंथालय सहाय्यक कु. ज्योती सुकराम गेडाम यांचा, विद्यापीठ चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गवारीत सामान्य प्रशासन विभागातील चौकीदार श्री मोरेश्वर शंकरआप्पा मुंजाळे यांचा आणि संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी संवर्गात इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय, अमरावती येथील अधीक्षक श्री प्रशांत केशवराव देशमुख यांचा, तर नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा, जि. अमरावती या महाविद्यालयाची 'एन.ई.पी. स्कूल कनेक्ट' या वार्षिकांकाकरीता महाविद्यालयाचा रु. ५००१/- रोख पारितोषिक व प्रशस्ती प्रमाणपत्र देवून कुलगुरूंनी सत्कार केला.



वार्षिकांक स्पर्धेतील विजेत्यांसमवेत कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

## वार्षिकांक स्पर्धा

वार्षिकांक स्पर्धा २०२४–२५ मधील विजेत्या महाविद्यालयांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे हस्ते पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये शहरी विभागातील बिगर व्यावसायिक गटातून प्रथम पारितोषिक श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या 'क्रिएशन' या वार्षिकांकास, व्दितीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावतीच्या 'प्रज्ञासूर्य' या वार्षिकांकास, तर तृतीय भारतीय महाविद्यालय, अमरावतीच्या 'भारती' या वार्षिकांकास, तर ग्रामीण विभागात बिगर व्यावसायिक गटात प्रथम इंदिरा महाविद्यालय, कळंबच्या 'कदंबिनी' व कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरबच्या 'अंतरंग' या वार्षिकांकास, द्वितीय गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदुरबाजारच्या 'फुलोर' या वार्षिकांकास, तर तृतीय आदर्श विज्ञान, जयरामदास भागचंद कला व बिर्ला महाविद्यालय, धामणगांव रेल्वेच्या 'गुलमोहोर' या वार्षिकांकास आणि शहरी व ग्रामीण विभागातील व्यावसायिक गटात प्रथम पी.आर.पोटे (पाटील) कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, अमरावतीच्या 'पोटेन्शिअल' या वार्षिकांकास, द्वितीय डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, घातखेड, अमरावतीच्या 'टेक्नो–रिदम' या वार्षिकांकास, तर तृतीय प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेराच्या 'टेक्नो–स्ट्रीम' या वार्षिकांकास पारितोषिक व स्मृतिचिन्ह देवून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विजेत्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांना व त्यांच्या प्रतिनिधींना गौरवान्वित केले.

संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन, वंदे मातरम्, राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कायक्रमाचे संचालन करीत आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी मानले. उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार व वार्षिकांक स्पर्धा वितरण समारंभाला विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणींचे सदस्य, संवैधानिक अधिकारी, सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी तसेच विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, शहरातील गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर व इतर



कुलसचिव डॉ. अविनाश असनारे



अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे



अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे





प्राचार्य डॉ. पवन भाऊ मांडवकर यांना पुरस्कार प्रदान करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



प्रा. डॉ. नंदकिशोर दिनकरराव गव्हाळे यांना पुरस्कार प्रदान करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



प्रा. डॉ. सौ. जयश्री दिपक धोटे यांना पुरस्कार प्रदान करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



सौ. संयोगिता विलास देशमुख यांच्यावतीने त्यांची मुलगी पुरस्कार स्वीकारतांना



सहायक कुलसचिव श्री मिलींद दत्तात्रय देशपांडे यांना पुरस्कार प्रदान करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



सहायक कुलसचिव डॉ. साक्षी संजयसिंह ठाकुर यांना पुरस्कार प्रदान करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



अधीक्षक सौ. स्मिता अमोल म्हैसाळकर यांना पुरस्कार प्रदान करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



अधीक्षक श्री अमोल अशोकराव म्हैसाळकर यांना पुरस्कार प्रदान करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



श्री संजय गुलाबराव कोकाटे यांना पुरस्कार प्रदान करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



कु. ज्योती सुखराम गेडाम यांना पुरस्कार प्रदान करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



अधीक्षक श्री प्रशांत केशवराव देशमुख यांना पुरस्कार प्रदान करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



श्री मोरेश्वर शंकरआप्पा मुंजाळे यांना पुरस्कार प्रदान करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांना पुरस्कार प्रदान करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

वार्षिकांक स्पर्धेतील विजेत्या महाविद्यालयांना पुरस्कार प्रदान करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते











वार्षिकांक स्पर्धेतील विजेत्या महाविद्यालयांना पुरस्कार प्रदान करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते









# 'नो व्हिकल डे' ला विद्यापीठात पर्यावरणस्नेही प्रतिसाद
# कुलगुरु ई-बाईकने, तर कुलसचिव सायकलने कार्यालयात दाखल!



ई–बाईक ने कार्यालयात येतांना
कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

देशाचे माननीय पंतप्रधान ना. श्री नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे आदरणीय मुख्यमंत्री ना. श्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या विशेष आवाहनाला प्रतिसाद देत, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये 'नो व्हिकल डे' (वाहनमुक्ती दिन) अत्यंत काटेकोरपणे पाळण्यात आला. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि प्रदुषणमुक्तीचा संदेश देण्यासाठी विद्यापीठातील वरिष्ठ अधिका–यांपासून ते कर्मचा–यांपर्यंत सर्वांनीच 'नो व्हिकल डे' पाळला.

कुलगुरू आणि कुलसचिवांचा आदर्श

या मोहिमेचे नेतृत्व स्वत: विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. 'नो व्हिकल डे' चे औचित्य साधत कुलगुरू डॉ. बारहाते हे आपल्या घरातून थेट विद्यापीठ कार्यालयात ई – बाईकने दाखल झाले. त्यांच्या या कृतीने विद्यापीठ परिसरात एक नवा आदर्श निर्माण केला. केवळ कुलगुरूच नव्हे, तर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर व इतर वरिष्ठ अधिका–यांनी सुद्धा सायकल चालवत या आवाहनाला पूर्ण पाठिंबा दिला. विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून ते प्रशासकीय इमारतीपर्यंत नेहमीसारखा गाड्यांचा आवाज आणि धूर नव्हता, तर सायकलची घंटी आणि पर्यावरण रक्षणाचा उत्साह पाहायला मिळाला.

मा. पंतप्रधान आणि मा. मुख्यमंत्र्यांचे आवाहन केवळ एका दिवसापुरते मर्यादित न राहता, तो आपल्या जीवनशैलीचा भाग बनला पाहिजे. प्रदूषण कमी करण्यासाठी आणि येणा–या पिढीला सुदृढ पर्यावरण देण्यासाठी असे उपक्रम अत्यंत गरजेचे आहे. विद्यापीठ परिवाराने दाखवलेला हा उत्साह कौतुकास्पद असल्याची भावना कुलगुरूंनी व्यक्त केली.

कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचाही सहभाग

विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात मोठ्या संख्येने भाग घेतला. बहुतांश कर्मचा–यांनी सार्वजनिक वाहतुक, सायकल, व ई–बाईकचा वापर केला, तर काहींनी 'कार पुलिंग' पध्दत अवलंबली. यामुळे विद्यापीठ परिसर पूर्णपणे प्रदूषणमुक्त आणि शांत दिसत होता. विद्यापीठाने घेतलेल्या या पुढाकारामुळे शहरात आणि शैक्षणिक वतुर्ळात त्यांचे भरभरून कौतुक होत असून, हा उपक्रम इतर संस्थांसाठीही प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही.

कुलगुरूंचे संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना आवाहन

कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना आवाहन केले की, देशाच्या विकास कार्यात आपले योगदान देण्यासाठी आणि समाजासमोर एक आदर्श निर्माण करण्यासाठी विद्यापीठाप्रमाणेच महाविद्यालयांमध्ये सुध्दा महिन्याच्या दर शनिवारी नो व्हिकल डे पाळण्यात यावा. याबाबत महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी सर्वसंबंधित शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांना अवगत करावे.



सायकल ने कार्यालयात येतांना
कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व इतर

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संचालित मॉडेल डिग्री कॉलेजच्या विद्यार्थिनीची उंच भरारी कु. वैष्णवी चौथे हिने एकाच वेळी चार परीक्षेत यश संपादित करुन रचला इतिहास



सत्कार करतांना मानद संचालक डॉ. ए.आर. म्हळसने

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संचालित बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजची विद्यार्थिनी कु. वैष्णवी रामभाऊ चौथे हिने सरळ सेवा परीक्षेत उज्वल यश संपादन करुन महाविद्यालयाच्या तसेच पर्यायाने विद्यापीठाच्या यशात मानाचा तुरा रोवला. कु. वैष्णवी चौथे हिने एकाच वेळी चार ठिकाणी परीक्षेत यश संपादन करुन एक इतिहास रचला असून त्यापैकी मुंबई उच्च न्यायालयात वरीष्ठ लघुलेखक या पदावर रुजू होणे तिने पसंत केले. त्यासोबतच डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, धर्मदाय विभाग, मुंबई आणि वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई या ठिकाणी हायर ग्रेड असल्याने लघुलेखक म्हणून एकाच वेळी तिची चारही ठिकाणी निवड झाली होती. कष्टाला जिद्द, चिकाटी, मेहनत, योग्य मार्गदर्शन आणि सातत्याची जोड मिळाल्यास नक्कीच यशाला गवसणी घालता येते, हे तिने सिद्ध केले.

अतिशय सामान्य कुटुंबातून प्रतिकूल परिस्थितीवर मात करून प्राथमिक शिक्षण झेडपी शाळेत झालेले असतानाही कु. वैष्णवी हिने यशाचे शिखर गाठले आहे. तिच्या या यशाबद्दल मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ.ए.आर. म्हळसने आणि इतर प्राध्यापकांनी तिचा सत्कार करून तिला याप्रसंगी शुभेच्छा दिल्यात. सोबतच तिच्या यशाची पायाभरणी करणाऱ्या आई–वडिलांचा देखील यावेळी सत्कार करण्यात आला.

कु. वैष्णवी हिने संपादित केलेल्या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ.ए.आर. म्हळसने यांनी तिचे अभिनंदन करुन तिला पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्यात. कु. वैष्णवीने तिच्या यशाचे श्रेय आई–वडील, मॉडेल डिग्री कॉलेजचे मार्गदर्शक, प्राध्यापक, महाविद्यालयामध्ये घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षेचे शिक्षक यांना दिले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. भांडक्कर यांनी केले.



# श्री संत गजानन महाराज औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभाग, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर बुलढाणा आणि व्दारका बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्था संचालित श्री संत गजानन महाराज फार्मसी महाविद्यालय, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने श्री संत गजानन महाराज फार्मसी महाविद्यालय, बुलढाणा येथे आयोजित पडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रोजगार मेळाव्याकरिता वैभव एन्टरप्राईझेस नागपूर, यशस्वी ग्रुप चिंचवड आणि फुलंब्री टेक्स्ट प्रा. लि. जालना यांच्या माध्यमातून ९ विविध आस्थापनामधील २४० पेक्षा अधिक रिक्त पदासाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आली. यामध्ये २५० हून अधिक उमदवारांनी नोंदणी करुन मुलाखती दिल्या. त्यामधून ८२ यशस्वी उमेदवारांना ऑफर लेटर प्रदान करण्यात आले.

मेळाव्याचे उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय बोरकर, उद्घाटक म्हणून डॉ. राजीव बोरकर, प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बुलढाणाचे सहाय्यक आयुक्त श्री गणेश बिटोडे, श्री बावस्कर तसेच रोजगार कक्ष प्रमुख डॉ. शितल सिरसाठ उपस्थित होते.

विशेष म्हणजे मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण योजना आणि प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना याबाबत मेळाव्याच्या ठिकाणी स्वतंत्र स्टॉल उपलब्ध करुन देण्यात आला आणि उपस्थित उमेदवारांना योजनांविषयी सविस्तर माहिती देऊन त्यांची नोंदणी करुन घेण्यात आली. रोजगार मेळाव्याच्या यशस्वी आयोजनाबद्दल कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी समाधान व्यक्त करुन नियुक्तीपात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात.



रोजगार मेळाव्याला उपस्थित विद्यार्थी

# उन्हाळी परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाचा पुढाकार .. पाचही जिल्हांत 'उष्माघात मदत कक्ष' स्थापन






**विद्यार्थ्यांचे आरोग्य ही आमची प्राथमिकता आहे. परीक्षेच्या काळात कडक उन्हामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊ नये, यासाठी हा मदत कक्ष अत्यंत प्रभावी ठरेल.' – कुलगुरू डॉ मिलींद बारहाते**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षा सध्या सुरू आहेत. वाढत्या तापमानामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान उष्माघात आणि निर्जलीकरण यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागू शकतो. ही बाब लक्षात घेऊन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागातर्फे विद्यापीठ परिक्षेत्रातील पाचही जिल्ह्यांमध्ये 'जिल्हास्तरीय उष्माघात मदत कक्ष' स्थापन करण्यात आले आहेत. या उपक्रमाच्या नियोजनासाठी गुरुवारी, ७ मे रोजी विद्यार्थी विकास विभागात एका विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी सभेच्या अध्यक्षस्थानी विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर होते. यावेळी उष्माघात जिल्हा समितीचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. अतुल बोडखे, तसेच समितीचे सदस्य डॉ. सावन देशमुख, डॉ. हरिदास आखरे, डॉ. नितीन सराफ, डॉ. राहुल सावरकर, डॉ. शीतल तायडे, प्राचार्य जी. एन. चौधरी आणि रोहन बुंदेले उपस्थित होते.


डॉ. राजीव बोरकर यांनी उष्माघात या संकल्पनेची पार्श्वभूमी आणि त्याचे गांभीर्य विषद केले. तर डॉ. सावन देशमुख व प्राचार्य अतुल बोडखे यांनी उष्माघातापासून बचाव करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले.

**विद्यार्थ्यांसाठी आरोग्य साहित्याचे वाटप**

या अभिनव उपक्रमांतर्गत संत गाडगे बाबा प्रतिष्ठानतर्फे परीक्षार्थी विद्यार्थ्यांसाठी ओआरएस पाकिटे, ग्लुकोज पावडर व इतर प्रथमोपचार साहित्याचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. दर्यापूर येथील जे. डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. के. बोडखे आणि अमरावती ग्रामीण विभागातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व प्राध्यापक या प्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यापीठाने राबविलेल्या या 'विद्यार्थीभिमुख' प्रयोगाबद्दल सर्व स्तरांतून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे आभार मानले जात आहेत. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. शीतल तायडे यांनी केले.

# श्री शिवाजी महाविद्यालय अकोला येथे जिल्हास्तरीय विद्यार्थी उष्माघात मदत कक्ष स्थापन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आणि गाडगे बाबा सामाजिक प्रतिष्ठान, अकोला यांचा संयुक्त उपक्रम



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व गाडगे बाबा सामाजिक प्रतिष्ठान, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने अकोला जिल्ह्यात उष्माघाताच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरीय मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सदर उपक्रम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत जिल्हा केंद्र म्हणून श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला या महाविद्यालयाची निवड करण्यात आली असून मदत कक्षाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. उद्‌घाटन कार्यक्रमाला विद्यापीठाचे विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, समिती सदस्य प्राचार्य डॉ. किरण खंडारे, डॉ. संजय तिडके, डॉ. नेत्रा मानकर, डॉ. सोनल कामे, डॉ. सचिन भुतेकर, प्रा. संतोष चव्हाण, श्री दर्शन जनईकर, प्रा.एन.एफ. चव्हाण, प्रा. प्राजक्ता पोहरे, प्रा. मयुरी गुडदे, सायली गोतमारे, रोशन चव्हाण व अनिशा कोल्हे, प्रा.वाय.के. अग्रवाल, डॉ. आशिष सरफ व डॉ. केतन वाकोडे आदी उपस्थित होते.

यावेळी सर्व सदस्यांच्या उपस्थितीत सभा संपन्न झाली, त्यामध्ये जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी उष्माघात मदत केंद्र सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच स्वच्छ व थंड पिण्याचे पाणी, उष्माघाताची लक्षणे ओळखण्यासाठी जनजागृती, तात्काळ प्राथमिक उपचार सुविधा, पालकांसाठी सावलीत विश्रांती व्यवस्था, जनजागृती फलक याशिवाय आपत्कालीन वैद्यकीय सेवेचा संपर्क यांसारख्या उपाययोजनांवर सभेत भर देण्यात आला.

मनोगत व्यक्त करताना विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्य संरक्षणासाठी जनजागृती व तात्काळ उपाययोजनांची गरज असल्याचे सांगितले. डॉ. संजय तिडके यांनी उष्माघाताची लक्षणे ओळखून वेळेवर प्राथमिक उपचाराचे महत्त्व सांगितले. प्रा. रोहन बुंदेले यांनी जिल्हास्तरीय मदत कक्षाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्वरित सहाय्य मिळण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे नमूद करुन गाडगेबाबा सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने प्रत्येक महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रांवर भेट देऊन विद्यार्थ्यांना मोफत ओ.आर.एस. व ग्लुकोजचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती दिली. अध्यक्षीय मनोगतात डॉ. रामेश्वर भिसे यांनी जिल्हा केंद्र म्हणून सर्व महाविद्यालयांनी समन्वयाने हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, संचालन व आभार प्रदर्शन गाडगे बाबा सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा जिल्हास्तरीय उष्माघात मदत कक्षाचे समन्वयक प्रा. रोहन बुंदेले यांनी केले. यावेळी जिल्हातील विविध महाविद्यालयांचे प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# विद्यापीठात आयोजित ‘आयुष्मान भारत कार्ड’ विशेष शिबीराला कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ आरोग्य केंद्राच्यावतीने नुकत्याच पार पडलेल्या आयुष्मान भारत (पी.एम.जेएवाय) अंतर्गत 'आयुष्मान कार्ड' विशेष शिबिराला विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. याप्रसंगी कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आपले 'आयुष्मान कार्ड' काढले.

विद्यापीठ परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृह येथे २६ व २७ मे, २०२६ रोजी सदर शिबीराचे आयोजन करण्यात आले. शिबीरात विद्यापीठात कार्यरत शिक्षकेत्तर कर्मचारी, अधिकारी, जॉब वर्कर, एकत्रित वेतन धारक, सेवानिवृत्त कर्मचारी यांनी आपले 'आयुष्मान कार्ड' काढले.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर शिबीर पार पडले. सदर शिबीरामध्ये जवळपास १८० कर्मचाऱ्यांनी नोंदणी केली. याप्रसंगी विद्यापीठ आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात तसेच डॉ. अंकुश मानकर, श्री अली मन्सुर, कु. स्वाती तायडे, श्री रमेश लिखितकर, मनिषा दमाहे आदी उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वीतेसाठी आरोग्य विभागातील श्री सचिन बाळापुरे यांनी परिश्रम घेतले.



# इंधन व उर्जा बचतीसाठी विद्यापीठात 'नो व्हिकल डे' व 'ऑनलाईन बैठकांवर' भर ..

## कुलगुरूंच्या उपस्थितीत सहविचार सभा संपन्न



सभेला संबोधित करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे

देशाचे सन्माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ स्तरावर विविध उपाययोजना राबविण्यासंदर्भात कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठात सहविचार सभा संपन्न झाली.

यावेळी कुलगुरूंनी संबोधित करतांना सांगितले, देशाच्या विकास कार्यात आपले योगदान देण्यासाठी आणि समाजासमोर एक आदर्श निर्माण करण्यासाठी विद्यापीठ काही महत्वपूर्ण निर्णय घेत आहे. या निर्णयानुसार विद्यापीठ स्तरावर उपाययोजना करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे.

**शनिवारी ऑनलाईन अध्यापन –** विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागांचे महिन्यातील सर्व शनिवारचे शैक्षणिक कामकाज ऑनलाई पध्दतीने घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

**नो व्हिकल डे –** महिन्याच्या प्रत्येक शनिवारी विद्यापीठात नो व्हिकल डे पाळण्यात येईल. त्या ठिकाणी परिसरात कोणीही पेट्रोल किंवा डिझेलची वाहने आणणार नाहीत. केवळ सायकल व ई – बाईक आणू शकतील किंवा विद्यापीठात बस ने येता येईल. यामधून दिव्यांग कर्मचारी यांना वगळण्यात आले आहे.

**ऑनलाईन बैठका –** ऑनलाईन बैठकांसंदर्भात विद्यापीठाच्या विविध विभागांतर्गत होणा–या सर्व समित्या व उपसमित्यांच्या बैठका प्रत्यक्ष घेण्याऐवजी ऑनलाईन किंवा आभासी पध्दतीने घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

**कारपुलिंग व शेअरिंग –** कारपुलिंग व शेअरिंग संदर्भात पुढील सहा महिन्यांसाठी एकाच भागातून येणारे सर्व अधिकारी व कर्मचा–यांनी वाहनांचे शेअरिंग किंवा कारपुलिंग करण्याचा प्रयत्न करावा, असाही निर्णय या सभेत घेण्यात आला.

याबाबत विद्यापीठाच्या प्रशासन विभागाकडून तातडीने परिपत्रक काढून सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागांना कळिवण्यात येणार असून सर्वांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावयाचे आहे, अशा सूचना याप्रसंगी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी दिल्यात. यावेळी व्यासपीठावर प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे उपस्थित होते. सहविचार सभेला विद्यापीठातील सर्व संवैधानिक अधिकारी तसेच शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख व समन्वयक उपस्थित होते.






# उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार



सत्कारप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व इतर

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संचालित मॉडेल डिग्री कॉलेज बुलढाणा येथे असून त्यासाठी महाराष्ट्र शासनाने पंधरा एकर जागा दिली आहे. त्या जागेवर इमारत आणि इतर शैक्षणिक, प्रशासकीय, क्रीडा व इतर सुविधा निर्माण करण्यासाठी १० कोटी रूपयांचा निधी सुद्धा शासनाने दिला आहे. परंतू सदर जागेवर अतिक्रमण करण्यात आले होते आणि सदर अतिक्रमण काढण्याकरीता विद्यापीठ प्रशासनाला प्रचंड मेहनत घ्यावी लागली. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या मार्गदर्शनाखाली कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, उपकुलसचिव (विधी) श्री मंगेश जायले, उपकुलसचिव (विकास) डॉ. सुलभा पाटील, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, उपकुलसचिव (मा.क.) डॉ. दादाराव चव्हाण व अभियांत्रिकी विभागातील कर्मचायांनी प्रचंड मेहनत घेतली आणि अतिक्रमण निर्मूलन करण्यात आले.

विद्यापीठाला जागा हस्तांतरीत झाल्यानंतर १४ मे रोजी त्याठिकाणी ना.श्री. प्रतापराव जाधव, राज्यमंत्री, आयुष (स्वतंत्र प्रभार) तथा राज्यमंत्री, आरोग्य व कुटुंब कल्याण, भारत सरकार व श्री संजय गायकवाड, विधानसभा सदस्य, बुलढाणा यांच्या शुभहस्ते भूमिपूजन करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांचेसह इतर मान्यवर मंडळी उपस्थित होती.

याकरीता उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल तसेच अनेक वर्षांपासून रखडलेले मॉडेल डिग्री कॉलेजचे काम पूर्णत्वास आणण्याकरीता अथक परिश्रम घेतल्याबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व गुलाब पुष्प देवून कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, उपकुलसचिव (विकास) डॉ. सुलभा पाटील, उपकुलसचिव (मा.क.) डॉ. दादाराव चव्हाण, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांचेसह अभियांत्रिकी विभागातील अभियंता श्री विजय चवरे, श्री आकाश सोळंके, मालमत्ता अधिकारी श्री एन.पी. देशमुख, श्री उदय वनस्कर, श्री मनिष शास्त्री, श्री पंकज ठाकूर, श्री संजय बाळापुरे, श्री शरद डुकरे आदींचा कुलगुरूंच्या कक्षात सत्कार करण्यात आला.

# प्रशासकीय कामात कर्मचाऱ्यांची निष्ठा महत्वाची - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते ..
# विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीप्रसंगी समारंभपूर्वक निरोप

दिवसेंदिवस विद्यापीठातून कर्मचाऱ्यांची संख्या कमी होत आहे. विद्यापीठापुढील आर्थिक आव्हाने आणि कर्मचाऱ्यांच्या कमी संख्येवर मात करण्यासाठी 'टीम वर्क' आणि 'समर्पण' हेच कळीचे मुद्दे असून प्रशासकीय कामात कर्मचाऱ्यांची निष्ठा महत्वाची असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या प्रभारी संचालक डॉ. तनुजा राऊत, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, सत्कारमूर्ती श्री संतोष वानखडे, सौ. वानखडे, श्री नरेश सोनोने, सौ. सोनोने व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

सत्कारमूर्ती श्री संतोष वानखडे व श्री नरेश सोनोने यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून कुलगुरूंनी, तर सौ. वानखडे व सौ. सोनोने यांचा साडीचोळी व करंडा देवून सौ. मोनाली तोटे पाटील यांनी सत्कार केला. कुलगुरू पुढे म्हणाले, दोन वर्षांपूर्वी विद्यापीठ सुमारे १७ कोटी रुपयांच्या तुटीत होते. मात्र, सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने आणि शिस्तबद्ध धोरणामुळे ही तूट आज शून्यावर आणण्यात यश आले आहे. येत्या दोन-तीन वर्षात निवृत्त होणाया कर्मचाऱ्यांची संख्या मोठी आहे. यावर उपाय म्हणून विद्यापीठाने आता आउटसोर्सिंगचा मार्ग अवलंबला असून याद्वारे प्रशासकीय कामाची गती कायम राखली जाईल. ज्याप्रमाणे रामायणात खारीने आपला वाटा उचलून रामसेतू उभारला, त्याचप्रमाणे प्रत्येक कर्मचाऱ्याने विद्यापीठाच्या ४३ वर्षांच्या सुवर्णमयी वाटचालीत मोलाचे योगदान दिले आहे. सेवानिवृत्त श्री संतोषजी वानखडे आणि श्री नरेशजी सोनोने या दोन कर्मचाऱ्यांच्या प्रदीर्घ सेवेबद्दल त्यांचा विशेष गौरव करण्यात आला. विद्यापीठ हे एक कुटुंब असून निवृत्तीनंतरही हे ऋणानुबंध कायम राहतील, असे सांगून दोन्ही सत्कारमूर्तींना उत्तम आरोग्य आणि सुख-समाधान लाभो, अशा भावना व्यक्त केल्यात.

प्रमुख अतिथी म्हणून बोलतांना डॉ. हर्षवर्धन देशमुख म्हणाले, माणसाच्या आयुष्यात बालपण, नोकरीचा काळ आणि निवृत्तीनंतरचा काळ अशा तीन महत्त्वाच्या इनिंग असतात. निवृत्तीनंतरची ही तिसरी इनिंग अधिक कठीण असते, कारण इथे स्वत:च्या निर्णयाने समाजहितासाठी काम करण्याची संधी मिळते. ही वेळ आत्मचिंतनाची असून, जर कर्तव्यात काही त्रुट्या राहिल्या असतील, तर त्या सुधारुन समाजाप्रती आपले उत्तरदायित्व पार पाडण्याची ही मोठी संधी आहे. निवृत्तीनंतरचा काळ हा केवळ विश्रांतीचा नसून समाजऋण फेडण्याचा आहे, असेही ते म्हणाले.

याप्रसंगी नियंत्रण अधिकारी डॉ. नितीन कोळी, डॉ. तनुजा राऊत तसेच विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख यांनी सत्कारमूर्तींच्या सेवाकाळातील कार्याची प्रशंसा करुन सर्वांना निरामय आरोग्याच्या शुभेच्छा दिल्यात. सत्कारमूर्ती श्री संतोष वानखडे व श्री नरेश सोनोने यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सेवाकाळात सहकाऱ्यांकडून मिळालेला आदर, स्नेहभाव याबद्दल आभार व्यक्त केले.

विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने अध्यक्ष श्री मंगेश वरखेडे, उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, डॉ. नितीन कोळी व श्री राजेश एडले यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश व पुस्तक देऊन सत्कार केला. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार जनसंपर्क विभागातील श्री ओम जगताप यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.



अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



व्य.प. सदस्य डॉ. हर्षवर्धन देशमुख मार्गदर्शन करतांना



श्री संतोष वानखडे यांचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



श्री नरेश सोनोने यांचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



कार्यक्रमाला उपस्थिती

# कमी मनुष्यबळातही विद्यापीठाचे कामकाज गतिमान - कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते

# विद्यापीठात सेवानिवृत्त कर्मचा-यांचा कर्तव्यपूर्ती सोहळा संपन्न

विद्यापीठाचे कामकाज अतिशय गतीने होत आहे, याचा अभिमान वाटतो आणि कर्मचारी सुध्दा अतिरिक्त प्रभार असतांनाही तितक्याच उत्साहाने आपली कामे करतात, त्यामुळे प्रशासकीय कामाची गतिशिलता कायम आहे, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा–यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य तथा वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अरूण हरणे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी केमटेक विभागप्रमुख डॉ.ए.बी. नाईक, गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, कार्यकारी अभियंता श्री शशिकांत रोडे, महानुभाव अध्यासन केंद्रप्रमुख डॉ. महंत सोनपेठकर, उपकुलसचिव (आस्थापना) श्री मंगेश वरखेडे, सत्कारमूर्ती डॉ. संयोगिता विलास देशमुख, श्री संजय धाकुलकर, श्री संजय कोकाटे, श्री आशिष शर्मा, श्री संदिप ताथोडे, श्री अनिल बुरघाटे, श्री प्रभाकर चाचरकर, श्री जी.आर. पटके तसेच जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे श्री प्रेम मंडपे उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. बारहाते म्हणाले, विद्यापीठात मनुष्यबळाची समस्या असूनही कर्मचारी कामाचा कोणताही ताण न घेता आपले काम जाणीवपूर्वक व जबाबदारीने करीत आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या कामकाजात गतिमानता आली असून प्रत्येक कर्मचा–याचा विद्यापीठाच्या विकासामध्ये मोठा वाटा आहे. देशातही संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नाव सर्वत्र आदराने घेतल्या जात असल्याचेही कुलगुरू म्हणाले. याप्रसंगी त्यांनी सर्व सेवानिवृत्त कर्मचा–यांना उज्ज्वल भविष्याकरिता शुभेच्छा दिल्यात. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व सत्कारमूर्तींचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन, तर सौ. धाकुलकर, सौ. कोकाटे, सौ. शर्मा, सौ. ताथोडे, सौ. बुरघाटे, सौ. चाचरकर, सौ. पटके यांचा डॉ. वैशाली धनविजय, सौ. प्रज्ञा बोंडे व सौ. राजश्री देसली यांनी साडी–चोळी व कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला.

प्रमुख अतिथी डॉ. अरूण हरणे म्हणाले, विद्यापीठाचा प्रत्येकच कर्मचारी प्रामाणिकपणे आपले काम करीत असून अगदी कुटुंबाप्रमाणे विद्यापीठाचे कामकाज सांभाळतात. आपण विद्यापीठात दिलेली सेवा, सर्वांशी असलेली वागणूक याची प्रचिती आपल्याला कौटुंबिक वातावरणातही दिसून येते. ख–या अर्थाने ही निवृत्तीची सुरुवात असून यापुढेही कर्मचारी विद्यापीठाला सेवा देतील व विद्यापीठाच्या विकासात आपला हातभार लावतील, अशी अपेक्षा व्यक्त करुन सर्व सत्कारमूर्तींना निरामय आरोग्याच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विद्यापीठ सेवेतून सेवानिवृत्त होणा–या सर्व सत्कारमूर्तींनी आपल्या मनोगतातून सेवाकाळात सहका–यांकडून मिळालेला आदरभाव, स्नेहाबद्दल आभार व्यक्त केले.

राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने अध्यक्ष श्री मंगेश वरखेडे, उपाध्यक्ष डॉ. अविनाश असनारे, कोषाध्यक्ष श्री राजेश एडले, सदस्य सौ. प्रज्ञा बोंडे व चंद्रशेखर लोखंडे यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश व पुस्तक देऊन सत्कार केला. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.



मार्गदर्शन करतांना व्य.प.सदस्य डॉ. अरूण हरणे



मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



डॉ. संयोगिता विलास देशमुख यांचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते




श्री संदीप ताथोडे यांचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते




श्री आशिष शर्मा यांचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते




श्री संजय कोकाटे यांचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



श्री संजय धाकुलकर यांचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते




श्री अनिल बुरघाटे यांचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते




श्री प्रभाकर चाचरकर यांचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते




श्री जी.आर. पटके यांचा सत्कार करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते



## विद्यापीठात बुद्धिस्ट स्टडीज सेंटरतर्फे बुद्धवंदनेचा कार्यक्रम संपन्न




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बुद्धिस्ट स्टडीज सेंटरतर्फे बुद्ध जयंतीचे औचित्य साधून बुद्धवंदनेचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, बुद्धिस्ट स्टडीज सेंटरचे समन्वयक प्रा. विनोद नागले, उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे, डॉ. सुलभा पाटील, कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, डॉ. प्रेमानंद तिडके, डॉ. गजानन मुळे, डॉ. कपिल कांबळे, प्रा. कमलाकर मोरे, रमेश जाधव, विनय झटाले, प्रेम मंडपे, श्री भाले, श्री लांडगे आदी कर्मचारी उपस्थित होते.

याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी आज महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि बुद्ध जयंती असा दुग्धशर्करा योग आल्याचे सांगितले. आजच्या युगात बुद्धांचे तत्वज्ञान सर्वांनी अंगीकारणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगून त्यांनी सर्वांना बुद्ध जयंतीच्या शुभेच्छा दिल्यात.

कार्यक्रमाची सुरुवात बुद्धवंदनेने करण्यात आली, बुद्धवंदनेचे संचालन प्रा. रामचंद्र वरघट यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन करीत आभार बुद्धिस्ट स्टडीज सेंटरचे समन्वयक प्रा. विनोद नागले यांनी मानले.

## विद्यापीठात
## पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांची पुण्यतिथी संपन्न



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांची पुण्यतिथी डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन वसतीगृह येथे संपन्न झाली. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वसतीगृहातील श्री चंद्रशेखर लोखंडे तसेच विद्यापीठातील कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## विद्यापीठात माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांची पुण्यतिथी संपन्न दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त कुलगुरूंनी दिली प्रतिज्ञा



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांची पुण्यतिथी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन म्हणून संपन्न झाली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले व उपस्थितांना दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त प्रतिज्ञा दिली. याप्रसंगी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, सहा. कुलसचिव श्री विलास काकडे तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व माजी पंतप्रधान भारतरत्न राजीव गांधी यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

## विद्यापीठात स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

दैनिक दिव्य मराठी
A Marathi Daily from Dainik Bhaskar Group

**उपक्रम** • विद्यापीठ स्थापनेला ४३ वर्षे पूर्ण, कुलगुरुंसह मान्यवरांची उपस्थिती, मार्गदर्शन

# उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार प्राप्त, वार्षिकांक स्पर्धेच्या विजेत्यांचा सत्कार




वार्षिकांक स्पर्धेतील विजेते. (दुसऱ्या छायाचित्रात )उत्कृष्ट सेवा गौरव विजेते

प्रतिनिधी । अमरावती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा ४३ वा वर्धापन दिन, महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार व वार्षिकांक स्पर्धेचे पुरस्कार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या वेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. हेमंत देशमुख, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे, मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारांतर्गत शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व १०० ग्रॅम चांदीचे पदक देवून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य,संचालक स्तरावरील संवर्गात उत्कृष्ट शैक्षणिक कार्याबद्दल इंदिरा महाविद्यालय, कळंबचे प्राचार्य डॉ. पवन मांडवकर यांचा, संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक संवर्गात गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदुरबाजार येथील प्राध्यापक तथा रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. नंदकिशोर दिनकर गव्हाळे व श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील प्राध्यापक तथा प्राणी शास्त्र विभागप्रमुख डॉ. जयश्री दिपक धोटे यांचा, विद्यापीठ स्तरावरील शिक्षक संवर्गात विद्यापीठाच्या गृहविज्ञान विभागातील प्राध्यापक डॉ. संयोगिता विलास देशमुख यांचा, विद्यापीठ प्रथम श्रेणी अधिकारी संवर्गात परीक्षा विभागातील सहा. कुलसचिव मिलींद दत्तात्रय देशपांडे व महाविद्यालयीन विभागातील सहा. कुलसचिव डॉ. साक्षी संजयसिंह ठाकूर यांचा, विद्यापीठ द्वितीय श्रेणी अधिकारी संवर्गात आस्थापना विभागातील अधीक्षक अमोल अशोक म्हैसाळकर व परीक्षा विभागातील अधीक्षक स्मिता अमोल म्हैसाळकर यांचा, विद्यापीठ तृतीय श्रेणी कर्मचारी संवर्गात वित्त विभागातील वरीष्ठ सहाय्यक संजय गुलाब कोकाटे व ज्ञान केंद्रातील ग्रंथालय सहाय्यक ज्योती सुकराम गेडाम यांचा, विद्यापीठ चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गवारीत सामान्य प्रशासन विभागातील चौकीदार मोरेश्वर शंकरआप्पा मुंजाळे यांचा आणि संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी संवर्गात इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय, अमरावती येथील अधीक्षक प्रशांत केशव देशमुख यांचा, तर नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा, जि. अमरावती या महाविद्यालयाची 'एन.ई.पी. स्कूल कनेक्ट' या वार्षिकांकाकरीता महाविद्यालयाचा रु. ५००१ रु. रोख पारितोषिक व प्रशस्ती प्रमाणपत्र देवून कुलगुरूंनी सत्कार केला.

संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन, वंदे मातरम्, राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कायक्रमाचे संचालन करीत आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी मानले. उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार व वार्षिकांक स्पर्धा वितरण समारंभाला विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणींचे सदस्य, संवैधानिक अधिकारी, सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी तसेच विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, शहरातील गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शहर विभागात क्रिएशनला, ग्रामीणमध्ये कदंबिनी, अंतरंग वार्षिकांकास प्रथम पुरस्कार

वार्षिकांक स्पर्धा २०२४-२५ मधील विजेत्या महाविद्यालयांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये शहरी विभागातील बिगर व्यावसायिक गटातून प्रथम पारितोषिक श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या 'क्रिएशन' या वार्षिकांकास, द्वितीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावतीच्या 'प्रज्ञासूर्य' या वार्षिकांकास, तर तृतीय भारतीय महाविद्यालय, अमरावतीच्या 'भारती' या वार्षिकांकास, तर ग्रामीण विभागात बिगर व्यावसायिक गटात प्रथम इंदिरा महाविद्यालय, कळंबच्या 'कदंबिनी' व कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरबच्या 'अंतरंग' या वार्षिकांकास, द्वितीय गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदुरबाजारच्या 'फुलोर' वार्षिकांकास, तर तृतीय आदर्श विज्ञान, जयरामदास भागचंद कला व बिर्ला महाविद्यालय, धामणगांव रेल्वेच्या 'गुलमोहोर' या वार्षिकांकास आणि शहरी व ग्रामीण विभागातील व्यावसायिक गटात प्रथम पी.आर.पोटे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंटच्या 'पोटेन्शिअल' या वार्षिकांकास, द्वितीय डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, घातखेड, अमरावतीच्या 'टेक्नो-रिदम' या वार्षिकांकास, तर तृतीय प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेराच्या 'टेक्नो-स्ट्रीम' या वार्षिकांकास पारितोषिक व स्मृतिचिन्ह देवून विजेत्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांना व त्यांच्या प्रतिनिधींना गौरवान्वित केले.

मराठी दैनिक **वृत्त केसरी**

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा वर्धापन दिन साजरा

# 'ब्रँड एस.जी.बी.ए.यु.' घडविण्याचा संकल्प

### कुलगुरू डॉ मिलिंद बारहाते यांचे प्रतिपादन –कुलगुरूंच्या हस्ते ध्वजारोहण



**प्रतिनिधी/ वृत्त केसरी**

**अमरावती, २ मे:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा 43 वा वर्धापन दिन, महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून विद्यापीठामध्ये 1 मे रोजी, 2026 कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या मंगल प्रसंगी विद्यापीठाच्या गौरवशाली प्रवासाचा आढावा घेत, येणाऱ्या काळात 'ब्रँड एस.जी.बी.ए.यु.' जागतिक स्तरावर नेण्याचा संकल्प कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी व्यक्त केला. ध्वजस्तंभाजवळ प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर व राजेश पिदडी उपस्थित होते. मार्गदर्शन करतांना कुलगुरू पुढे म्हणाले, विद्यापीठाने 25 कोटी रुपयांचा 'सेंटर ऑफ एक्सलन्स इन ए.आय. मशीन लर्निंग' चा प्रस्ताव सादर केला असून, सर्व विद्याशाखांमध्ये 'इंट्रोडक्शन टू ए.आय.' विषय अनिवार्य करणारे हे अग्रगण्य विद्यापीठ ठरले आहे. कॅम्पसमध्ये 10 जी.बी.पी.एस. इंटरनेट कनेक्टिव्हिटीसह 'नेक्स्ट जनरेशन' केंद्र उभारले जात आहे. नवीन शैक्षणिक धोरणांतर्गत डेटा सायन्स, रिटेल मॅनेजमेंट यांसारखे नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम आणि 'इंटर्नशिप पोर्टल' सुरु करण्यात आले आहे. विद्यापीठाने केवळ नोकरी मागणारे नव्हे, तर नोकरी देणारे तरुण घडविण्यावर भर दिला आहे. 'स्टार्टअप इंडिया' अंतर्गत 7 स्टार्टअप्सना 52 लाखांचा निधी वाटप करण्यात आला. 39 व्या आंतर विद्यापीठ युवा महोत्सवात यश मिळविण्यासोबतच, सॉफ्टबॉलमध्ये महिला व पुरुष दोन्ही संघांनी राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक पटकाविला. क्रीडा व सांस्कृतिक स्तरावर विद्यापीठाचे खेळाडू व कलाकारांनी उत्कृष्ट प्रदर्शन करुन विद्यापीठाच्या नावलौकिकात भर टाकली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी प्रशंसनीय कामगिरी केली. आर्चरीमध्ये यशदीप भोगे याने आशियाई सुवर्णपदक जिंकून विद्यापीठाचा नावलौकिक वाढवला. 'पीएम-उषा' योजनेतून 40 कोटींच्या निधीद्वारे नूतनीकरण आणि चिखलदरा येथे 'ट्रायबल स्कील डेव्हलपमेंट सेंटर' ची उभारणी केली जात आहे. 'कौशल्य हेच भविष्यातील चलन आहे', असे नमूद करत विद्यापीठ सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल करताना विकसित भारतासाठी 'संशोधन आणि समाज' यांची सांगड घालण्याचे आवाहन कुलगुरूंनी केले.



# प्रशासकीय कामात कर्मचाऱ्यांची निष्ठा महत्वाची

### * कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे प्रतिपादन विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीप्रसंगी समारंभपूर्वक निरोप





**आमा प्रतिनिधी/४ मे**

**अमरावती :** अमरावती : विद्यापीठातील वाढती आर्थिक ओढाताण आणि कर्मचाऱ्यांची घटती संख्या यावर मात करण्यासाठी 'एकजूट' अन् 'समर्पण' हेच परवलीचे शब्द आहेत. प्रशासकीय गाडा हाकताना कर्मचाऱ्यांची कामाप्रती असलेली निष्ठाच संस्थेला तारते, असे मौलिक विचार कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी मांडले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित 'कर्तव्यपूर्ती' सोहळ्यात ते बोलत होते.दोन वर्षांपूर्वी विद्यापीठ १७ कोटींच्या तुटीत होते, पण शिस्तबद्ध कारभारामुळे ही तूट आज शून्यावर आली आहे. निवृत्त होणाऱ्यांचे प्रमाण मोठे असल्याने आता 'बाह्यस्रोत' पद्धतीने कामाची गती राखली जाईल. जसा रामायणात खारीने आपला वाटा उचलला, तसाच कर्मचाऱ्यांनी ४३ वर्षांच्या प्रवासात मोलाचा वाटा उचलला आहे. यावेळी व्यासपीठावर हर्षवर्धन देशमुख, डॉ. महेंद्र ढोरे, डॉ. अविनाश असनारे, डॉ. नितीन कोळी, डॉ. तनुजा राऊत, अजय देशमुख, डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते. सत्कारमूर्ती संतोष वानखडे आणि नरेश सोनोने यांचा सहकुटुंब विशेष गौरव करण्यात आला. निवृत्तीनंतरचा काळ हा विरंगुळ्याचा नसून समाजऋण फेडण्याची मोठी संधी असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. या सोहळ्याला मंगेश वरखेडे, राजेश एडले, ओम जगताप यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख व कर्मचारी मोठ्या संख्येने हजर होते.

हिंदुस्थान
पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# प्रशासकीय कामात कर्मचाऱ्यांची निष्ठा महत्वाची : कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

## विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीप्रसंगी समारंभपूर्वक निरोप



अमरावती दि. ४ : दिवसेंदिवस विद्यापीठातून कर्मचायांची संख्या कमी होत आहे. विद्यापीठापुढील आर्थिक आव्हाने आणि कर्मचायांच्या कमी संख्येवर मात करण्यासाठी 'टीम वर्क' आणि 'समर्पण' हेच कळीचे मुद्दे असून प्रशासकीय कामात कर्मचा-यांची निष्ठा महत्वाची असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या प्रभारी संचालक डॉ. तनुजा राऊत, विद्यापीठ कर्मचारी संघाचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, सत्कारमूर्ती श्री संतोष वानखडे, सौ. वानखडे, श्री नरेश सोनोने, सौ. सोनोने व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

सत्कारमूर्ती श्री संतोष वानखडे व श्री नरेश सोनोने यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून कुलगुरूंनी, तर सौ. वानखडे व सौ. सोनोने यांचा साडीचोळी व करंडा देवून सौ. मोनाली तोटे पाटील यांनी सत्कार केला. कुलगुरू पुढे म्हणाले, दोन वर्षांपूर्वी विद्यापीठ सुमारे १७ कोटी रुपयांच्या तुटीत होते. मात्र, सर्व अधिकारी आणि कर्मचायांच्या सहकार्याने आणि शिस्तबद्ध धोरणामुळे ही तूट आज शून्यावर आणण्यात यश आले आहे. येत्या दोन-तीन वर्षात निवृत्त होणाया कर्मचायांची संख्या मोठी आहे. यावर उपाय म्हणून विद्यापीठाने आता आउटसोर्सिंगचा मार्ग अवलंबला असून याद्वारे प्रशासकीय कामाची गती कायम राखली जाईल. ज्याप्रमाणे रामायणात खारीने आपला वाटा उचलून रामसेतू उभारला, त्याचप्रमाणे प्रत्येक कर्मचायाने विद्यापीठाच्या ४३ वर्षांच्या सुवर्णमयी वाटचालीत मोलाचे योगदान दिले आहे. सेवानिवृत्त श्री संतोषजी वानखडे आणि श्री नरेशजी सोनोने या दोन कर्मचायांच्या प्रदीर्घ सेवेबद्दल त्यांचा विशेष गौरव करण्यात आला. विद्यापीठ हे एक कुटुंब असून निवृत्तीनंतरही हे ऋणानुबंध कायम राहतील, असे सांगून दोन्ही सत्कारमूर्तींना उत्तम आरोग्य आणि सुख-समाधान लाभो, अशा भावना व्यक्त केल्यात.

